# वार्षिक अहवाल
# दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्र
# विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे.
# शैक्षणिक वर्षे २०२१-२२

**समन्वयक- प्रा. डॉ. एस. जी. गोल्डे**

**सदस्य - प्रा. डॉ. एस. जी. जोशी , प्रा. डॉ. सी. एस. वाणी , प्रा. डॉ.एम. पी. तरडेजा**

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्राचा वार्षिक अहवाल देतांना मला मनस्वी आनंद होतो की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव संलग्न असलेले खानदेशातील एकमेव दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्र विद्यावर्धिनी महाविद्यालयात गेल्या दशकापासुन कार्यरत असुन या विभागाव्दारे शासनाने घोषित केलेल्या विविध २१ प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना नाममात्र प्रवेशशुल्कामध्ये म्हणजे रु. १०० /- मध्ये प्रवेश दिला जातो. या शिवाय त्यांच्यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करुन त्यांच्यातील विविध कलागुणांना चालना देण्याचे काम दिव्यांग विभागाच्या माध्यमातुन केले जाते.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये महाविद्यालयात वेगवेगळया प्रकारचे एकुन २० दिव्यांग विद्यार्थी एफ.वाय.बी.ए. ते एम.ए. या वर्गात प्रवेशित असुन या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील दिव्यांग विभागाव्दारे विविध प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. जसे लेखनिक उपलब्ध करुन देणे, अदयावत सॉफ्टवेअरसह संगणक, ब्रेल लिपीमधील पुस्तके, व्हील चेअर, समाजकल्याण विभाग व इतर सामाजिक व स्वंयसेवी संस्थाकडुन शिष्यवृत्ती मिळवुन देण्यासाठी मदत केली जाते. याशिवाय वेगवेगळया ठिकानी नोकरीच्या जागा विषयी माहिती देणे, त्यांचा फॉर्म भरुन देणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे महाविद्यालयातील फक्त दिव्यांग विभागच यांना मदत करतो असे नाही तर महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापक वृंद, कार्यालयीन कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थी, राष्ट्रीय छात्र सेना विभागाचे विद्यार्थी आणि इतर विद्यार्थी देखिल दिव्यांग विद्यार्थ्यांना मदत करीत असतात. मग ते लेखनिकाच्या माध्यमातुन असेल, अंतर्गत चाचणी परीक्षा देण्यासाठीची मदत असेल किंवा रस्ता ओलडण्यासाठीची मदत असेल. अशा विविध प्रकारे महाविद्यालयातील प्रत्येक घटक दिव्यांग विद्यार्थ्यांना मदत करत असतो.

दिव्यांग विभागामध्ये जागतिक दिव्यंग दिन, पांढरी काठी दिन, लुई ब्रेल जयंती व पुण्यतिथी, हेलन केलर जयंती व पुण्यतिथी, केंद्र सरकार व राज्यसरकार यांनी वेळोवेळी

सुचविलेले उपक्रम या व्यतिरिक्त महाविद्यालयात होणाऱ्या विविध कार्यक्रमामध्ये सहभाग नोदविण्यासाठी विभागामार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देउन सहभाग नोदविला जातो.

या शैक्षणिक वर्षामध्ये दिव्यांग विभागाव्दारे दिव्यांग विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची माहिती व्हावी, स्पर्धा परीक्षा देतांना दिव्यांग विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी व त्यांना स्पर्धा परीक्षा विषयी आवड निर्माण व्हावी या उद्‌देशाने जिल्हा प्रशासन कार्यालय,वर्धा व विद्यावर्धिनी महाविद्यालय दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन ऑनलाईन कार्यशाळेचेआयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून दिल्ली येथील मा. पंतप्रधान यांच्या कार्यलयात कार्यरत असलेल्या दिव्यांग IAS अधिकारी मा. प्रांजल पाटील या होत्या, तर उदघाटक म्हणून मा. श्रीमती प्रेरणा देशभ्रतार, जिल्हाधिकारी वर्धा या होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन मा. अक्षयभाऊ छाजेड हे होते.

या विभागाव्दारे ३ डिसेंबर हा जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. पी. वाय.गावित, उपप्रचार्य प्रा. के.वाय. अन्सारी आणि इतर प्राध्यापक वृंद व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम पार पडला.

तसेच २७ जुन रोजी हेलन केलर यांच्या जयंती निमित्त "हेलन केलर यांचा जीवनपट" या विषयावर मा. प्रा.डॉ. जयश्री गावित मॅडम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी उपप्राचार्य प्रा. डॉ. वाय.जी. पाटील हे होते. या कार्यक्रमाला दिव्यांग विद्यार्थी व प्राध्यापक वृंद मोठया संख्येने उपस्थित होते.

दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षाच्या काळात लेखनिकाची आवश्यकता असते. या लेखनिकाची गरज विद्यावर्धिनी महाविद्यालयातील कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. पी. ओ. व्यास आणि त्यांचे इतर सर्वच सहकारी प्राध्यापक बंधु- भगिनी लेखनिक उपलब्ध करुन देण्याचे महत्वाचे काम करतात, कार्यालयातील सर्व कर्मचारी हे देखिल या विभागाला नेहमीच सहकार्य करतात. या निमित्ताने सर्वांचे आभार व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

समन्वयक
(प्रा.डॉ. सर्जेराव गंगाधर गोल्डे)
दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्र
विद्यावर्धिनी महाविद्यालय,धुळे